


दैनिक
लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

dainiklokaarambh@gmail.com

LOK AARAMBH

संपादकःराहुल मारोतीराव वाईकर

कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

प्रतिनिधी नेमणे आहे.

बीड आंबेजोगाई गेवराई वडवणी केज परळी पाटोदा शिरूर कासार धारूर आष्टी माजलगाव इच्छुकाने संपर्क साधावा

९४०३६ ४१४८२

राहुल मारोतीराव वाईकर

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | सोमवार १६ डिसेंबर २०२४ | अंक ७० पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु

## नव्या सरकारच्या मंत्रीमंडळ विस्ताराने राज्यात जल्लोष,



राज्यातील नव्या सरकारच्या मंत्रीमंडळाचा विस्तार आज रविवारी नागपूर येथील राजभवनात झाला. राजभवनाच्या हिरवळीवर हा शपथविधी सोहळा रंगला. यावेळी एकूण नव्या मंत्रिमंडळातील ३३ आमदारांनी कॅबिनेट मंत्री पदाची शपथ घेतली तर सहा जणांना राज्यमंत्री पदाची शपथ घेतली. असे एकूण पहिल्या टप्प्यात एकूण ३९ जणांनी मंत्रीपदाची शपथ घेतली. या मंत्रिमंडळात विस्तारात भाजपाने नऊ चेह-यांना तर अजितदादांच्या राष्ट्रवादीने पाच नव्या चेह-यांना तर एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेने सहा नव्या चेह-्यांना संधी दिली आहे. राज्यभरात या नव्या सरकारच्या मंत्रिमंडळ विस्तारामुळे त्या-त्या मतदार संघात पक्षांच्या कार्यकर्त्यांनी फटाके वाजवून ढोलताशाच्या गजरात जल्लोष केला आहे.



हैदराबाद युथ कवरेज के महाराष्ट्र जनरल सेक्रेटरी पद मिलने पर हमारे बड़े भाई ( माजी उप सरपंच पात्रुड तथा ग्राम पंचायत सदस्य) जनाब यूसुफ शेख इनकी गुलपोशी करते हुए उस्मानिया फाउंडेशन मजलेगांव

## लोकनेत्या मा.पंकजा गोपीनाथ मुंडे यांची कॅबिनेट मंत्री निवड झाल्याने भाजपा जिल्हा कार्यालयात आनंद उत्सव साजरा




बीड. आज नागपूर येथे झाल्याल्य महायुती शपथविधी कार्यक्रम मध्ये पंकजाताई मुंडे यांनी कॅबिनेट मंत्री पदाची शपथ घेतल्यानंतर बीड जिल्हा भाजप कार्यलय येथे पेढे वाटून तसेच फटाके फोडून मोठया प्रमाणात आनंद उत्सव साजरा करण्यात आला. या वेळी भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष नवनाथ अण्णा शिराळे, दलित मोर्चा जिल्हा अध्यक्ष अजय सवाई, शिवाजी अप्पा मुंडे, संगीताताई धसे, गणेश पुजारी, संदीप उबाळे, भूषण पवार, बंटी फड, हरीश खाडे, दत्त भाऊ थिगळे, बाबुराव परळकर, अनिल अमोल वाढतिले, कपिल सौदा,केशव बडे,राजू शहाणे, अनंत नागरगोजे आदी उपस्थित होते.

## नुजिवीडू सीड्सच्या मका -कॅप्सूल वाणामुळे शेतकरी राजा आनंदी




वैजापूर प्रतिनिधी – ऊक्कडगाव येथील प्रगतशील शेतकरी संदिप जगन्नाथ निकम यांनी त्यांच्या शेतात नुजिवीडू सीड्स कंपनीचे कॅप्सूल हे मकाचे बियाणे याची लागवड केली होती. त्यांच्या सांगण्यावरून त्यांनी एक हेक्टर मका लागवड केली होती. आणि त्यामध्ये त्यांनी एक बॅग नुजिवीडू सीड्स चे कॅप्सूल हे वाण लावले होते. ज्या वेळेस मक्याचे खळे केले त्यावेळेस त्यांना इतर वाणाच्या तुलनेत कॅप्सूल या वाणाचे पाच क्विंटल मका जास्त झाली. एका पाकिटाचे उत्पन्न २३ क्विंटल आले. तर सदरील शेतक-याने पुढच्या वर्षी संपूर्ण मका लागवड करत्यावेळी नुजिवीडू सीड्सचे कॅप्सूल हेच वाण लावण्याचा निर्धार केला.

## रामदास आठवले यांच्याकडून जाहीरपणे नाराजी व्यक्त



केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी आज पत्रकार परिषद घेत काही मुद्द्यांवर नाराजी व्यक्त केली. विशेष म्हणजे आज महायुती सरकारच्या नव्या मंत्र्यांच्या शपथविधीचा नागपुरात कार्यक्रम पार पडला. तर दुसरीकडे रामदास आठवले यांनी पत्रकार परिषद घेत नाराजी व्यक्त केली. ङ्गमी शिर्डीत लढण्यासाठी इच्छुक होतो. अजून एखादी जागा मिळाली असती तर दोन जागा आमच्या निवडून आल्या असत्या. लोकसभा निवडणुकीवेळी आम्हाला जागा मिळाली नाही. विधानसभेत तीन ते चार जागा मिळतील याची अपेक्षा होती. मात्र एकही जागा मिळाली नाही. त्यामुळे कार्यकर्त्यांमध्ये नाराजी आहेङ्क, अशी खंत रामदास आठवले यांनी व्यक्त केली.ङ्गदेवेंद्र फडणीस मुख्यमंत्री झाले. त्याबद्दल त्यांचे अभिनंदन. मात्र त्यांनी अनेकवेळा आम्हाला एमएलसी आणि मंत्रीपद देण्याचे आश्वासन दिले. आम्ही विधानसभा निवडणुकीत सांगितलं होतं की जागा देत नसाल तर आम्हाला मंत्रिमंडळात पहिल्यांदा सन्मान द्या. मागच्या मंत्रिमंडळ विस्तारावेळी सांगितलं होतं की, तुम्हाला मंत्रिपद देऊ. मात्र अडीच वर्ष मंत्रिमंडळ विस्तार झाला नाही. यामुळे आमच्या कार्यकर्त्यांना संधी मिळाली नाहीङ्क, अशा शब्दांत रामदार आठवले यांनी नाराजी व्यक्त केली.

# बीडच्या सरपंच हत्याकांडावर देवेंद्र फडणवीस यांची महत्त्वाची प्रतिक्रिया

### आरोपी कोणीही असो, कुठल्याच आरोपीला सोडलं जाणार नाही.



बीडच्या केज तालुक्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांची निर्घृण हत्या करण्यात आली आहे. संतोष देशमुख यांचं आधी अपहरण करण्यात आलं होतं. त्यानंतर त्यांची निर्घृण हत्या करण्यात आली. या घटनेवरुन विरोधकांकडून महायुती सरकारवर निशाणा साधला जातोय. संतोष देशमुख यांच्या मारेक-यांना अटक व्हावी यासाठी मस्साजोगच्या गावक-यांनी रास्ता रोको आंदोलन केलं होतं. सलग ११ तासांच्या रास्ता रोको आंदोलनानंतर पोलीस अधीक्षकांनी गावक-यांच्या सगळ्या मागण्या मान्य केल्या होत्या. तसेच पोलीस अधीक्षकांनी दोन पोलीस अधिका-यांवर कारवाई केली. या प्रकरणाचा तपास आता सीआयडीकडे वर्ग करण्यात आला आहे. तसेच तीन आरोपींना अटक करण्यात आली आहे. पण चार आरोपी अद्यापही फरार आहेत. या घटनेवरुन हिवाळी अधिवेशनात विरोधकांकडून सरकारला घेरलं जाण्याची शक्यता आहे. विरोधकांनी आज सरकारच्या चहापानाच्या कार्यक्रमावरही बहिष्कार टाकला. यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पार पडलेलल्या पत्रकार परिषदेत फडणवीस यांनी परभणी आणि बीडच्या घटनेवर महत्त्वाची प्रतिक्रिया दिली.

### देवेंद्र फडणवीस बीडच्या घटनेवर काय म्हणाले ?

बीड जिल्ह्यात अतिश निर्घृणपणे सरपंचाची हत्या करण्यात आली आहे. या प्रकरणी काही लोकांवर कारवाई केली आहे. काहींना सस्पेंड केलं आहे तर काहींना घरी पाठवलं आहे. तीन आरोपी सापडले आहेत, चार आरोपींचा शोध सुरु आहे. ते लवकरच सापडतील. केस सीआयडीला तपासासाठी दिली आहे. स्पेशल एसआयची स्थापन करुन या केस संदर्भात सर्व चौकशी आम्ही करणार आहोत. आरोपी कोणीही असो, कुठल्याच आरोपीला सोडलं जाणार नाही. अशाप्रकारच्या घटना या महाराष्ट्रात गांभीर्यानेच घेतल्या जातात आणि गांभीर्याने घेतल्या जातील. त्यामुळे एसआयटीच्या माध्यमातून सर्व धागेदोरे शोधून काढण्याचं काम हे निश्चितपणे करुङ्क, असं देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं.

# आष्टी तालुक्यात सुरू असलेला अवैध वाळू उपसा बंद करण्याची मागणी

### सरपंच राधेश्याम धस यांच्या वाहनावर हायवा घालण्याचा प्रयत्न, आष्टी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

आष्टी । प्रतिनिधी तालुक्यात महसूल व पोलीस प्रशासनाच्या जाणिवपूर्वक दुर्लक्षामुळे वाळू उपसा मोठ्या प्रमाणावर सुरू असून त्यामुळे शासनाचा कोट्यवधी रुपयांचा महसूल बुडत आहे. अवैध वाळू वाहतूक करणारे भरधावपणे वाहने चालवत असून जामगाव येथील सरपंच राधेश्याम देविदास धस यांच्या वाहनावर हायवा चालकाने वाहन घालण्याचा प्रयत्न केल्याची घटना घडली. या प्रकरणी राधेश्याम धस यांनी शुक्रवारी (ता.१३) आष्टी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. जामगाव येथे भरधाव वेगाने हायवा चालवणाऱ्या चालकाला धोकादायक पद्धतीने वाहन चालवू नको असे सांगितल्यामुळे अवैध वाहतूक करणाऱ्या हायवा चालकाने ममी असेच वाहन चालवत असतो, तू आडवा येऊ नको, जीवाला मुकशीलफ असा दम दिला होता. राधेश्याम धस हे गुरुवारी (ता १२) सायं ६.३० वा सुमारास जामगाव ते आष्टा मार्गे जामगावकडे येत असताना भारत बेंझ कंपनीचा हायवा क्र. (एम एच -१६-उउ- ५५ ८८) चालकाने राधेश्याम धस यांच्या वाहनावर हायवा घालून जीवे मारण्याचा प्रयत्न केला. राधेश्याम धस यांनी त्यांचे वाहन रस्त्याच्या खाली उतरवल्यामुळे ते वाचले. ही घटना सतीश धस, अविनाश धस, संभाजी झांबरे त्यांनी समक्ष पाहिली. यावेळी या अवैध वाळू वाहतूक करणाऱ्या वाहनांमध्ये आणखी एक अनोळखी इसम उपस्थित होता. याप्रकरणी हायवा चालक मन्सूर शेख याच्यावर आष्टी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. आष्टी परिसरातील अनेक गावातील नदीमध्ये महसूल व पोलीस प्रशासनाच्या जाणीवपूर्वक दुर्लक्षामुळे अवैध वाळू उपसा राजरोसपणे सुरु असून त्यामुळे शासनाचा कोट्यवधी रुपयांचा महसूल बुडत आहे. अवैध वाळू उपसा बंद करण्यात यावा आणि त्या ठिकाणी असलेले वाळूचे साठे जप्त करण्यात यावेत अन्यथा शुक्रवार ( ता.२०) पासून तहसील कार्यालया समोर आंदोलन करण्याचा इशारा रामहरी पांडुरंग धुमाळ, प्रशांत प्रकाश श्रीखंडे, श्रीपाद राजेंद्र बन, अमोल ज्ञानेश्वर बन, निखिल रंगनाथ धोंडे, आकाश दत्तात्रय ढेंगे, परीक्षित प्रदीप काकडे, संतोष बाळू पवार, अमोल पांडुरंग भोसले, वैभव बाबासाहेब सांगळे, निलेश नामदेव राऊत, महेश दासा रणसिंग यांनी निवेदनाद्वारे दिला आहे.

# बाळराजे पवारांच्या वाढदिवसा निमित्त गेवराई मतदारसंघात विविध कार्यक्रमाचे आयोजन




गेवराई: प्रतिनिधी लोक इच्छा मतदार संघातील लोकनेते बाळराजे पवार यांचा वाढदिवसा निमित्त विविध सामाजिक उपक्रमाने साजरा करण्यात येणार आहे बाळराजे दादा पवार यांच्या वाढदिवसा निमित्त आरोग्य शिबीर, रुग्णालयात रुग्णाना फळे वाटप, विद्यार्थ्यांना शालेय साहित्यांचे वाटप, गरजु लोकांना बिलॅकट,रक्तदान शिबीर आयोजन करुन बाळराजे पवार यांचा वाढदिवस साजरा करण्यात येणार आहे स्वच्छ गेवराई सुंदर गेवराईचे जनक गोरगरीबांचा आधार मा.बाळराजे दादा पवार यांचा दि.२१ डिसेंबर रोजी गेवराई मतदारसंघात विविध सामाजिक उपक्रमांने वाढदिवसा निमित्त शहरात रक्तदान शिबीर, आरोग्य शिबीर, शालेय साहित्यांचे वाटप, अशा विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहेत तर सर्व कार्यक्रमास मा.आ.लक्ष्मण आण्णा पवार, सौ गिताभाभी बाळराजे पवार ,शिवराज पवार उपस्थित राहणार आहेत तरी मतदारसंघातील सर्वानी आरोग्य शिबीरात सहभाग घ्यावेत असे संयोजन समितीच्या वतिने आव्हान करण्यात आले होते

# कोट्यवधींच्या महसूलाच्या बुडतीला जबाबदार कोण ?

### मुरूम उत्खनन प्रकरणात अधिकाऱ्यांची मौनव्रतीः रहिवाशांकडून चौकशीची मागणी

**बीड/प्रतिनिधी**

बीड । प्रतिनिधी इमामपूर रोड आणि परिसरातील चराटा फाटा, घोडका राजुरी, काकड हिरा, तळेगाव या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर अवैध मुरूम उत्खनन सुरू असून शासनाचा कोट्यवधींचा महसूल बुडाल्याचे समोर येत आहे. स्थानिकांकडून हा प्रश्न उपस्थित होत आहे की, या अवैध उत्खननाला पाठबळ कोणाचे आहे? संबंधित अधिकाऱ्यांची भूमिका संशयास्पद ठरत आहे. तलाठी आणि मंडळ अधिकारी हे सर्व प्रकरण गप्प राहून बघत असल्याचे आरोप होत आहेत. विचारणा केली असता, हे मुरूम उत्खनन शासकीय कामासाठी सुरू असल्याचा दावा केला जातो. मात्र, शासकीय कामासाठी महसूल बुडवून असा मुरूम उपसा होऊ शकतो का, हाच संशोधनाचा विषय बनला आहे. याआधी पोलीस प्रशासनाने तीन हायवा, एक पोकलेन आणि एक जेसीबी जप्त केली होती. मात्र, तलाठी आणि मंडळ अधिकाऱ्यांनी पंचनामा



करून कायदेशीर चौकटीत सोडून दिल्याची चर्चा आहे. जर उत्खनन केलेल्या क्षेत्रावर योग्य दंड आकारला गेला असता, तर मुरूम माफियांची हिंमत झाली नसती, असेही स्थानिक सांगत आहेत.शहरातून आणि पोलीस अधीक्षक कार्यालय समोरून अवैध मुरूम वाहतूक करणारे बिना नंबर हायवा खुलेआम फिरत आहेत. या वाहनांमुळे एखादी अनुचित घटना घडल्यास जबाबदार कोण असणार, हा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे.अवैध उत्खनन रोखण्यासाठी कडक कारवाई होणे गरजेचे असून, महसूल विभाग, पोलीस प्रशासन आणि संबंधित अधिकारी यांच्या भूमिकेची चौकशी होणे अत्यावश्यक आहे. अन्यथा या भागातील नैसर्गिक संसाधनांचा ऱ्हास होऊन शासनाचा मोठा तोटा होईल हे मात्र नक्कीच..!

# संपादकीय

## वेतनवाढ कमीच !

चालू आर्थिक वर्षाच्या दुसऱ्या तिमाहीत विकास दर ५.४ टक्के इतका कमी झाल्याने सरकार चिंतित आहे. विविध वस्तूंची मागणी घटल्याचे यावरून स्पष्ट झाले. मागणी जनतेची क्रयशक्ती कमी झाल्यामुळे घटली आहे. महागाईच्या तुलनेत सामान्यांचे वेतन किंवा उत्पन्न वाढलेले नाही हे अनेक अर्थतज्ज्ञ गेले काही महिने सांगत आहेत. मागणी घटण्याचा परिणाम विकासदरावर थेट झाला आहे. खासगी क्षेत्रातील उद्योगांचा नफा प्रचंड वाढला आहे, तरी या क्षेत्रातील कामगार/कर्मचाऱ्यांच्या वेतनात पुरेशी वाढ झालेली नाही, हे देखील आता समोर येत आहे. देशातील उद्योगांची प्रातिनिधिक संस्था ङ्गफिकीफने सरकारसाठी तयार केलेल्या एका अहवालात याचे विश्लेषण करण्यात आले आहे. खासगी कंपन्यांमध्ये वेतन किंवा पगार उत्तम असतो असा समज आहे; पण तो या अहवालाने खोटा ठरण्याची शक्यता आहे. यावर उपाय शोधणे सरकारसाठी डोकेदुखी ठरणार आहे. संघटित किंवा औपचारिक क्षेत्राची ही स्थिती असेल, तर अनौपचारिक किंवा असंघटित क्षेत्रातील वेतनमानाविषयी कल्पनाच केलेली बरी. कारण या क्षेत्रातील दरडोई वेतन अथवा उत्पन्न याविषयी कोणतीही ठाम माहिती उपलब्ध नाही किंवा ती जमवण्याचा बहुतेक कधी प्रयत्नही झाला नसावा. देशातील कंपन्या, मग त्या शेअर बाजारात सूचिबद्ध असोत अथवा नसोत, भरपूर नफा कमवत आहेत. ङ्गफिकीफच्या अहवालानुसार व सरकारकडील माहितीनुसार त्यांचा नफा २०१९ ते २०२३ या चार वर्षांत ङ्गचार पटीनेफ वाढला आहे. इंजिनिअरिंग, उत्पादन प्रक्रिया, मूलभूत सुविधा (इन्फ्रास्ट्रक्चर) या गटातील कंपन्यांना ङ्गईएमपीआयफ असे संबोधले जाते. या क्षेत्रातील चार वर्षांतील सरासरी वेतनवाढ अवघी ०.८ टक्के आहे. याच क्षेत्रात सर्वात जास्त कामगार असतात. बँकिंग, विमा व वित्त सेवा क्षेत्रातील वेतनवाढ या काळात २.८ टक्के, माहिती तंत्रज्ञान क्षेत्रासाठी ४ टक्के, किरकोळ व्यापारासाठी ३.७ टक्के, वाहतूक क्षेत्रासाठी ४.२ टक्के आहे. केवळ ग्राहकोपयोगी वस्तू–अल्पकालीन व दीर्घकालीन उपयोगाच्या– क्षेत्रात चार वर्षांत सरासरी वेतनवाढ ५.४ टक्के राहिली. या चार वर्षांत महागाईवाढीचा दर टक्क्यांमध्ये अनुक्रमे ४.८, ६.२, ५.५, ६.७ व ५.४ असा होता. महागाईतील वाढीशी वेतनाचा मेळ घातला तर प्रत्यक्ष वेतनवाढ अत्यंत कमी किंवा ङ्गउणेफअसल्याचे दिसते. ही स्थिती ङ्गऔपचारिकफ किंवा संघटित क्षेत्रातील कामगारांची आहे. देशातील एकूण कामगार/कर्मचाऱ्यांपैकी सुमारे ४० कोटी व्यक्ती खासगी क्षेत्रात आहेत. तरीही एकूण श्रमिकांपैकी केवळ २१ टक्के ङ्गपगारदारफगटात मोडतात. सूचिबद्ध खासगी कंपन्यांचा ङ्गकर्मचाऱ्यांवरील खर्चफ कमी होत असल्याचे सांगितले जाते. त्याची दखल देशाचे मुख्य आर्थिक सल्लागार व्ही. अनंत नागेश्वरन यांनाही घ्यावी लागली. कंपन्यांचा नफा वाढण्यात कर्मचार्यांना कमी वेतन द्यावे लागणे ही बाब महत्त्वाची आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांचे वेतन वगळले तर कामगार/ कर्मचारी यांची वेतनवाढ अधिकच अल्प ठरते. कोरोना काळानंतर देशात आर्थिक विषमता वाढली असल्याचे तज्ज्ञ वारंवार सांगत आहेत; पण केंद्र सरकार ती बाब स्वीकारणे टाळत आहे. कंपन्यांना जेव्हा नफा मिळतो तेव्हा त्याचा मोठा हिस्सा भाग धारकांना ङ्गलाभांशाफच्या (डिव्हिडंड) रूपात दिला जातो. कंपनीचे सर्वात जास्त समभाग (शेअर) प्रवर्तकांच्या किंवा मालकांच्या हाती असतात. साहजिकच त्यांना कोट्यवधी रुपये मिळतात. कंपनीच्या नफ्याचा काही भाग कर्मचाऱ्यांना वेतनवाढीच्या रूपात का दिला जात नाही? नागेश्वरन यांनीही हा मुद्दा उपस्थित केला. सरकारी कर्मचार्यांची संख्या कमी असली तरी त्यांना भरपूर वेतन, महागाई भत्त्यात वाढ दिली जाते. खासगी क्षेत्रास तसे करण्यास सरकार सांगू शकत नाही. ते भांडवलदार धार्जिणे असल्याचा आरोप म्हणूनच होतो. कामगारांसाठी झगडणार्या संघटना व नेते आता शिल्लक नाहीत हे श्रमिकांचे दुर्दैव आहे. सारांश, अल्पवेतनात जीवन कंठणे सामान्यांना भाग आहे.

# यंगेस्ट जगज्जेता!

ङ्गहवा में उडता जाए, मोरा लाल दुपट्टा मलमल काफच्या वयात चेन्नईच्या दोम्माराजू गुकेशने ६४ घरांच्या पटावर जगज्जेतेपदाची मोहोर उमटवली. काळ्या मोह–यांनिशी खेळणा–या गुकेशने सिंगापूर येथे सुरू असलेल्या जागतिक बुद्धिबळ अजिंक्यपद स्पर्धेत गुरूवारी चीनच्या डिंग लिरेनची अभेद्य भिंत १४ व्या आणि अखेरच्या डावात भेदली. माजी विश्वविजेत्या ३२ वर्षीय लिरेनला १८ वर्षीय गुकेशने चितपट करून भारतीय तिरंगा डौलाने फडकावत बुद्धिबळ इतिहासातील सर्वांत युवा जगज्जेता बनण्याचा मान मिळवला. भारतीय बुद्धिबळ क्षेत्रासाठी गुरूवारचा दिवस गुकेशने संस्मरणीय ठरवला. विश्वनाथन आनंदनंतर गुकेश भारताचा दुसरा जगज्जेता ठरला. गुकेशने रशियाच्या गॅरी कास्पारोव्हचा (२२ व्या वर्षी) गत १४ वर्षापासूनचा युवा जगज्जेतेपदाचा विक्रम मोडीत काढत नव्या अध्यायाची नोंद केली. सुमारे ४ तास रंगलेल्या १४ व्या आणि अखेरच्या फेरीत डिंग लिरेनला ५८ चालींमध्ये पराभूत होण्यास भाग पाडणारा गुकेश हा जगातील एकूण १८ वा जगज्जेता ठरला. वयाच्या १८ व्या वर्षी १८ वा जगज्जेता! लिरेनने १३८ वर्षाच्या बुद्धिबळ जगज्जेतेपदाच्या इतिहासात केलेली सर्वांत मोठी घोडचूक गुकेशच्या पथ्यावर पडली. १४ वा डाव बरोबरीत सुटला असता तर शुक्रवारपासून टायब्रेकरद्वारे सामन्याचा निकाल लागला असता मात्र गुकेशने ७.५–६.५ अशा फरकाने विजय मिळवत जगज्जेतेपदाला गवसणी घातली. पांढ–या मोह–यांसह खेळताना लिरेनने डावाची आश्वासक सुरुवात केली होती. गुकेशने डावाच्या मध्यात आपली पटावरील स्थिती मजबूत केली होती त्यामुळे ही लढत बरोबरीत सुटेल, असे वाटत असतानाच लिरेनने १९ व्या चालीत मोठी चूक केली आणि त्याचा फायदा उठवत गुकेशने लिरेनला चेकमेट केले. जगज्जेतेपदाची ही लढत गुकेश १२ व्या फेरीआधीच सहज जिंकेल, असे भाकित अनेक बुद्धिबळ पंडितांनी वर्तवले होते. कदाचित त्यांना गत वर्षभरापासून मोजक्याच स्पर्धांमध्ये खेळणा–या लिरेनच्या ताकदीचा अंदाज आला नसावा. स्पर्धेला प्रारंभ झाल्यानंतर पहिल्याच फेरीत लिरेनने पांढ–या मोह–यांसह गुकेशला पराभूत केले होते; परंतु गुकेशने ङ्गहार नही मानुंगाफ असे म्हणत तिस– या फेरीत लिरेनला जशास तसे प्रत्युत्तर देत पराभवाचा बदला घेतला होता. त्यानंतर सलग ७ डाव बरोबरीत सोडवल्यानंतर गुकेशने ११ व्या डावात विजय मिळवत आघाडी घेतली होती; परंतु लिरेनने जोरदार मुसंडी मारत १२ वा डाव जिंकला आणि सामना बरोबरीत आणला. ६.५–६.५ अशा गुण बरोबरीत अखेरचा डाव सुरू झाला. या डावात पांढ–या मोह–यांसह खेळणा–या लिरेनची घोडचूक गुकेशच्या पथ्यावर पडली आणि प्रतिस्पर्ध्याला ङ्गचेकमेटफ देत गुकेशने पहिल्याच प्रयत्नात जगज्जेतेपदावर आपले नाव कोरले. सामन्यानंतर गुकेश म्हणाला, गत दशकभरापासून मी या क्षणाचे स्वप्न बघत होतो. १४ वा डाव ज्या प्रकारे सुरू झाला तो पाहता मला जिंकण्याची खात्री नव्हती; पण मला प्रतिस्पर्ध्यावर दडपण टाकण्याची संधी मिळाली आणि मी ती साधली. या स्पर्धेत गुकेश पहिल्या डावात पराभूत झाला होता; परंतु अखेरच्या डावात त्याने काळ्या मोह–यांनिशी लिरेनवर बाजू उलटवली. २०१० मध्ये विश्वनाथन आनंदने बल्गेरियाच्या टोपालोवविरुद्ध पहिल्याच डावात हार पत्करली होती; पण १२ डावांच्या त्या लढतीत अखेरच्या डावात काळ्या मोह–यांनिशी खेळून टोपालोववर बाजी उलटवत आनंदने जगज्जेतेपद पटकावले होते. २०२४ मध्ये त्या इतिहासाची पुनरावृत्ती घडली २००६ मध्ये जन्मलेल्या गुकेशने वयाच्या सातव्या वर्षापासूनच बुद्धिबळ खेळण्यास प्रारंभ केला. त्याचे वडील रजनीकांत हे तज्ज्ञ डॉक्टर आहेत तर आई पद्मा यांनी जीवशास्त्रात डॉक्टरेट मिळवली आहे. गुकेशने २०१५ मध्ये ९ वर्षाखालील गटात आशियाई शालेय स्पर्धा जिंकली. २०१८ मध्ये १२ वर्षाखालील गटात जागतिक युवा स्पर्धेचे जेतेपद मिळवले तर याच सालात आशियाई युवा स्पर्धेत तब्बल ५ सुवर्ण पदके जिंकण्याची किमया साधली. २०१७ पासून गुकेश वरिष्ठ गटात (खुल्या) खेळण्यास पात्र ठरला. ऑक्टोबर २०२२ मध्ये गुकेशने जलद बुद्धिबळ स्पर्धेत मॅग्नस कार्लसनला पराभवाचा धक्का दिला होता. मॅग्नस त्या वेळचा जगज्जेता होता. या विजयामुळे गुकेशकडे जगाच्या नजरा वळला होत्या. २०२४ मध्ये गुकेशने कँडिडेटस् स्पर्धेत बाजी मारली. त्यानंतर भारतीय पुरुष संघाला ऑलिम्पियाड सुवर्ण मिळवून देण्यात मोलाची कामगिरी केली आणि आता जागतिक जेतेपद मिळवून आपल्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला. जागतिक लढतीत एकूण १४ पारंपरिक (क्लासिकल) डाव होतात. सर्वप्रथम ७.५ गुणांचा टप्पा गाठणारा खेळाडू विजेता ठरतो. पहिल्या ४० चालींसाठी १२० मिनिटे, पुढील २० चालींसाठी ६० मिनिटे आणि उर्वरित चालींसाठी १५ मिनिटांचा वेळ दिला जातो. काळ्या मोह–यांनी ४० चाली होत नाहीत तोवर सामना बरोबरीत सोडवता येत नाही. १४ डावानंतरही गुण बरोबरी राहिल्यास विजेता ठरवण्यासाठी टायब्रेकरचा आधार घेतला जातो. गुकेशला विश्वनाथन आनंदचे मार्गदर्शन लाभले आहे. अखंड मेहनतीचे फळ त्याला मिळाले आहे. एखाद्या गोष्टीवर लक्ष केंद्रीत करण्याचे कौशल्य त्याच्याकडे आहे. इतक्या कमी वयात त्याने जी प्रगल्भता दाखवली ती वाखाणण्याजोगी आहे. तो बेधडक, आत्मविश्वासपूर्ण खेळ करतो. मोक्याच्या क्षणी संतुलन ढळू न देण्याचा गुण त्याच्याकडे आहे. गुकेशचे कौशल्य आणि मानसिक स्थैर्य अफलातून असेच होते. त्याने शेवटपर्यंत जिंकण्याची जिद्द सोडली नाही. या उलट लिरेनने बचावात्मक खेळावर अधिक भर दिला शिवाय तो टायब्रेकरवर अति विसंबून राहिला. ढासळलेल्या मनोवृत्तीतून त्याला सावरता आले नाही. त्याने गुकेशच्या विजयाचे कौतुक केले आहे. या जेतेपदाबद्दल गुकेशला १३ लाख अमेरिकन डॉलर्सचे बक्षीस मिळाले आहे. भारताकडे गुकेशसह आर. प्रज्ञानंद, विदीत गुजराथी, दिव्या देशमुख, तानिया सचदेव, असे असंख्य गुणवान बुद्धिबळपटू आहेत. यंदाचे वर्ष भारतीय बुद्धिबळाचा कायापालट करणारे वर्ष ठरले आहे. वर्षाच्या प्रारंभीच नागपूरच्या दिव्या देशमुखने कनिष्ठ गटाचे जागतिक जेतेपद मिळवले असून ३ बुद्धिबळपटू कँडिडेटस् स्पर्धे साठी पात्र ठरले. ६४ घरांचा राजा गुकेशला मानाचा सलाम! हिंदी चित्रपट गीतात मुकेश तसा बुद्धिबळात गुकेश!

# सरपंच संतोष देशमुख हे भ्रष्ट प्रशासन व राजकीय व्यवस्थेचा बळी

महाराष्ट्र शासन उद्योग ऊर्जा व कामगार विभाग शासन निर्णय ३ जून २००५ अनन्वे पवन ऊर्जा निर्मिती धोरण, २००४ अंतर्गत राज्यात पवनऊर्जा प्रकल्प उभारण्यासाठी का र्यपद्धती ठरवण्यात आली. सदरील कार्यपद्धतीनुसार महाराष्ट्रमध्ये अपारंपारिक ऊर्जा साधनाचा, प्रकल्पाचा विकास व विस्तार करण्याचे अधिकार महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (महाऊर्जा) या संस्थेकडे आहे. व त्यामुळे पवन ऊर्जा प्रकल्पाच्या विकासाचे व विस्ताराचे काम महाऊर्जा मार्फत करण्याचे ठरवले. सदर योजने अंतर्गत केंद्र शासनामार्फत महाराष्ट्र शासनामध्ये विविध ठिकाणी पवन ऊर्जा निर्मितीक्षम स्थळे जाहीर करण्यात आले. सदरील काम महाऊर्जा किंवा खाजगी प्रवर्तक महाराष्ट्रातील पारेषण व वितरण कंपन्यांच्या तांत्रिक प्रमाणानुसार व अंदा जपत्रका नुसार करण्यात येते. कामासाठी लागणारी ५०% रक्कम हरित ऊर्जा निधी मधून अनुदान म्हणून उपलब्ध करून दिली जाईल व ५० टक्के रक्कम बिनव्याजी कर्जाच्या स्वरूपात देण्यात येईल. सदरील पवन ऊर्जा प्रकल्प उभारण्यात येणाऱ्या जागेची कागदपत्रे, खरेदी खत, छअ परमिशन, भूविज्ञान व खणीकरण विभागाचे न हरकत, विकास आयुक्त (उद्योग) यांचे जमिनीचा औद्योगिक वापरासाठीचे नङ्गहरकत प्रमाणपत्र, वन विभागाचे नाहरकत तसेच प्रकल्पासाठी आवश्यक त्या सर्व कायदेशीर व वैज्ञानिक बाबींची पूर्तता प्रकल्पधारकांकडून केली जाईल. उदा. स्थानिक स्वराज्य संस्था, महसूल विभाग, खनिकरण विभाग, प्रदूषण विभाग, वन विभाग, नागरी उड्डाण विभाग, समुद्र किनारपट्टी व संरक्षण विभागासारख्या संस्थेचे ङ्गनाहरकत प्रमाणपत्रफप्रकल्प धारकाने स्वतः प्राप्त करणे बंधनकारक असेल. महाराष्ट्र शासन उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग यांनी दि.२ नोव्हेंबर २०२२ रोजी राज्यातील ६६ के.व्ही. व त्यापेक्षा अधिक. क्षमतेच्या अति उच्चदाब पारेषण वाहिन्यांसाठी उभारण्यात येणाऱ्या मनोऱ्याने व्याप्त जागेचा तसेच सरपंच संतोष देशमुख हे भ्रष्ट प्रशासन व राजकीय व्यवस्थेचा बळी अति उच्चदाब पारेषण वाहिनीच्या पट्ट्याखालील जमिनीचा नुकसान भरपाईपोटी मोबदला देण्यासंदर्भात सुधारित धोरण आखण्यात आले आहे. वरील धोरणानुसार शेतकऱ्यांच्या जमिनीवरील पारेषण वहिनीच्या पट्ट्याखालील संपादित करण्यासाठी मार्गदर्शक सूचना दिलेल्या आहेत. त्यामध्ये मागील ३ वर्षाचा जमिनी खरेदी–विक्री व्यवहार पाहणे, चालू बाजार मूल्य पाहणे, व जे मुल्य जास्त आहे ते देऊन त्यावर १५% वाढीव मोबदला देण्यात यावा. इत्यादी मार्गदर्शक सूचना दिलेल्या आहेत. तसेच भूसंपादन कायद्यातील जवळ–जवळ सर्व तरतुदी दिलेले आहेत. सदरील जमिनी संपादित करत असताना शेतकऱ्याला नोटीस काढून संयुक्त मोजणी करणे, तसेच उपविभागीय स्तरावरील मूल्यांकन करण्यासाठी उपवि भागीय अधिकारी (प्रांत अधिकारी) तसेच जिल्हास्तरीय अपिलीय अधिकारी म्हणून संबंधित जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आलेली आहे. त्यानंतर १ डिसेंबर २०२२ रोजी परत शासनाने शेतकऱ्यांच्या बाधित झालेल्या जमिनीच्या मोबदल्या संदर्भात मार्गदर्शक सूचना जाहीर केल्या आहेत. बीड जिल्ह्यातील बालाघाटच्या डोंगररांगांमधून अनेक ठिकाणी सदरील ऊर्जा प्रकल्पा अंतर्गत पवन ऊर्जेचे टॉवर्स उभे केले जात आहेत.


ॲड.एन.एल. जाधव

त्यामध्ये विविध खाजगी मालकीच्या कंपन्या उदा.पाटोदा तालुक्यांमध्ये रेणू ग्रीन एम.पी.एच. प्रायव्हेट लिमिटेड, मारुती विन पार्क डेव्हलपर्स पुणे, लुंमकड स्कायफिस्टा, इत्यादी कंपन्यांने पवन ऊर्जा प्रकल्प उभारण्याचे काम सुरू केले आहे. सदरील पवन ऊर्जा प्रकल्प उभारत असताना शेतकऱ्यांच्या जमिनी भूसंपादित करत असताना शासन निर्णयाप्रमाणे कुठलीही कार्यपद्धतीचे अवलंबन न करता, शेतकऱ्यांना कायद्याचे अज्ञान असल्याचा गैरफायदा घेऊन, शेतकऱ्यांना कुठलीही नोटीस न काढता, बाधित जमिनीची मोजणी न करता व शेतकऱ्याला नोटीस न काढता एकतर्फी शेतकऱ्यांच्या जमिनीचे बाजारमूल्य ठरवले जाते व त्यामध्ये सदरील खाजगी कंपनीचे कर्मचारी काही स्थानिक राजकीय भ्रष्ट आमदार, काही भ्रष्ट प्रशासकीय अधिकारी, हे संगणमत करून शेतकऱ्याकडे दलाल पाठवून त्यांना धमक्या देऊन, वेळ पडली तर जबरदस्तीने जमिनीचे ताबे घेऊन, सदरील शेतकऱ्याला बाजार मूल्यापेक्षा कमी दराने रकमा देऊन, सदरील कंपन्यांना जमीन संपादनासाठी बेकायदेशीर मदत करतात व यामधून भ्रष्ट मार्गाने आर्थिक व्यवहार करतात, असे अनेक ठिकाणी निदर्शनास आलेले आहे. सदरील व्यवहारामधून करोड रुपयाची माया का ही प्रशासकीय अधिकारी व काही भ्रष्ट पुढारी करत आहेत. यापूर्वी बीड जिल्ह्यामध्ये अशाच अनेक प्रकरणांमध्ये अपहरण व खंडणीचे गुन्हे नोंदले गेले आहेत. या सर्व बाबी राजकीय लोकप्रतिनिधी, प्रशासकीय अधिकारी, पोलीस अधिकारी यांना ज्ञात आहेत व याच मार्गाने बीड जिल्ह्यामध्ये तथाकथित कार्यसम्राट व त्यांचे बगलबच्चे हे शेतकऱ्यांची लूट करत आहेत वरील खाजगी पवन ऊर्जा प्रकल्प उभा करणाऱ्या कंपनीने अनेक ठिकाणी भूविज्ञान व खनिजीकरण विभाग, उद्योग विभाग, स्थानिक स्वराज्य संस्था, महसूल विभाग, खणीकरण विभाग, इत्यादीकडून न हरकत प्रमाणपत्र न घेता बेकायदेशीर प्रकल्प उभा केले आहेत व वरील शासनाच्या नियमाचे कुठलेही पालन न झाल्यामुळे काळा पैसा कमावण्याचे ते साधन होऊन बसलेले आहे. त्यामुळे बीड जिल्ह्यामध्ये अपहरण करणे, खंडणी मागणी, खून करणे असे प्रकार घडत आहेत. तसेच सदरील काळा पैसा नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकांमध्ये मतदाराला मतदान करण्यासाठी अमिष म्हणून दिला गेला याबाबत जनतेमध्ये चर्चा आहे. बीड जिल्ह्यामध्ये असलेल्या केज तालुक्यातील मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांचा निघृन हत्या झाली असून वरील भ्रष्ट यंत्रणाच याला जबाबदार आहे. त्यामुळे स्वतःला कार्यसम्राट म्हणून घेणाऱ्या राजकीय व प्रशासकीय अधिकाऱ्यांनी एकमेकांवर चिखल फेक करण्यापेक्षा वरील भ्रष्ट यंत्रणा सुधारून त्याच्यावर कायदेशीर नियंत्रण आणून ज्या शेतकऱ्यांच्या जमिनीवरील प्रकल्पासाठी बाधित झालेल्या आहेत त्यांना न्याय द्यावा. तसेच महाराष्ट्र व केंद्र सरकारने बीड जिल्ह्यातील नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रामध्ये वरील पवन ऊर्जा निर्माण करण्यासाठी प्रकल्प उभे करणाऱ्या खाजगी कंपनीची चौकशी करावी. तसेच सरपंच संतोष देशमुख यांची हत्या करणाऱ्या आरोपींची व ज्यांच्या सांगण्यावरून हत्या करण्यात आली त्यांची उइख मार्फत चौकशी करून संबंधितावर फास्टट्रॅक कोर्टमार्फत केस चालवून कारवाई करावी. मयत सरपंच संतोष देशमुख यांच्या कुटुंबाला शासनाने आर्थिक मदत करावी.

# सोळंके, धस यांना डावलत दोन्ही मुंडेंना मंत्रिमंडळात संधी






**बीड प्रतिनिधी**

बीड दि.१५ (बातमीदार): नागपूरमध्ये रविवारी राज्य मंत्रिमंडळाचा विस्तार झाला. यावेळी ३३ कॅबिनेट मंत्री आणि ६ राज्यमंत्र्यांनी शपथ घेतली. यामध्ये भाजपचे १९, शिवसेनेचे ११ आणि राष्ट्रवादीच्या ९ आमदारांनी मंत्रिपदाची शपथ घेतली. बीडमध्ये एकाच घरात दोन मंत्रिपदं गेलेली आहेत. पण ती दोन पक्षातून आहेत. भाजपच्या राष्ट्रीय सचिव पंकजा मुंडे आणि राष्ट्रवादी कॉंग्रेसचे फायरब्रँड नेते धनंजय मुंडे यांनी कॅबिनेट मंत्रिपदाची शपथ घेतली. धनंजय मुंडे यांच्या निकटवर्तीयांचा खून प्रकरणात हात असल्याचं बोललं जातंय. या प्रकरणात खंडणीच्या गुन्ह्यात वाल्मिक कराड यांच्यावर गुन्हा दाखल झाला आहे. त्यामुळे राज्यभर धनंजय मुंडेंबाबत चर्चा होती. शेवटी त्यांचे नाव फायनल झालं. मागच्या पाच वर्षात राजकीय विजनवासात गेलेल्या पंकजा मुंडेंना भाजपने विधान परिषेदवर संधी दिल्यानंतर आता मंत्रिपदाची शपथ दिलेली आहे. त्यामुळे पुन्हा एकदा पंकजा मुंडे पक्षात आणि सरकारमध्ये सक्रीय झालेल्या दिसतील. बीडमध्ये दोन मंत्रिपदं आणि तेही एकाच घरात गेल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे. बीडमधून राष्ट्रवादी कॉंग्रेसचे ज्येष्ठ नेते प्रकाश सोळंके यांना तर सुरेश धस यांना भाजपकडून मंत्री पदाची अपेक्षा होती पण दोन्ही पक्षाने दोघांनाही डावललं `ते. यावेळी त्यांचं नाव मंत्रिपदासाठी निश्चित झाल्याच्या चर्चा होत्या. परंतु त्यांना पुन्हा एकदा पक्षाने नाराज केलं आहे. प्रकाश सोळंके हे बीडच्या माजलगाव विधानसभा मतदारसंघाचे आमदार आहेत. बीडमधून मंत्रिपदासाठी आणखी एक नाव पुढे येत होतं. ते म्हणजे आष्टी–पाटोदा–शिरुर मतदारसंघाचे भाजप आमदार सुरेश धस यांचं. भाजपकडून पंकजा मुंडे यांच्याऐवजी सुरेश धस यांचं नाव लोकांच्या चर्चेत होतं. शिवाय मस्साजोगचं खून प्रकरण धसांनी लावून धरलेलं होतं. मात्र सुरेश धस यांना संधी मिळालेली नाही.

## एकट्या पंकजा मुंडे विधान परिषदेच्या आमदार

राज्याच्या मंत्रिमंडळात आज एकूण ३९ जणांनी मंत्रिपदाची शपथ घेतली असली तरी यात फक्त पंकजा मुंडे यांच्यासाठीच वेगळा न्याय लावण्यात आला आहे. मंत्रिमंडळात ३८ आमदारांना एक न्याय आणि एकट्या पंकजा मुंडे यांना वेगळा न्याय देण्यात आला आहे. एकट्या पंकजा मुंडे या विधानपरिषदेतून मंत्री झालेल्या आमदार आहेत. तर उरलेले सगळे ३८ मंत्री हे विधानसभा निवडणुकीत निवडून आलेले आहेत. तसंच पंकजा मुंडे आणि धनंजय मुंडे हे दोन्ही बहीण–भाऊही मंत्रिमंडळात असणार आहेत. बहीण–भाऊ एकाच मंत्रिमंडळात असण्याची महाराष्ट्रातली ही पहिलीच वेळ आहे

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
सोमवार १६ डिसेंबर २०२४
https://lokaarambh.com



## तांदळेश्वर विद्यालय तांदळवाडी घाट शाळेत आरोग्य शिबिर



बीड । प्रतिनिधी सिविल हॉस्पिटल बीड कडून आयोजित आरोग्य शिबिर तांदळेश्वर विद्यालय तांदळवाडी घाट नवगण शिक्षण संस्था संचलित या शाळेमध्ये संपन्न झाले. याप्रसंगी डॉ रमेश गुंजाळ सर त्याचबरोबर डॉ स्नेहल गोसावी मॅडम आरोग्य सेवक श्री शेख करीम सर उपस्थित होते प्रत्येक विद्यार्थ्यांची त्यांनी तपासणी केली व त्यांची नोंद घेऊन सिविल हॉस्पिटल बीड येथे येऊन त्यांच्यासाठी उपचार करणार आहेत व जे विद्यार्थी किरकोळ आजारी होते त्यांच्यासाठी त्यांनी टेबलेट्स देऊन मार्गदर्शन केले. विद्यार्थिनी व विद्यार्थिनी साठी स्नेहल गोसावी मॅडम व डॉक्टर रमेश गुंजाळ सर यांनी खूप चांगले मार्गदर्शन केले या मार्गदर्शनामध्ये मानसिक आरोग्य व शारीरिक आरोग्य याबद्दल व गुप्तरोग याबद्दलही त्यांनी माहिती सांगितली आजार रोग लपवल्याने वाढत असतो तसेच मानसिक आरोग्याचे व्यवस्थापन कसे करावे ताण-तणावाचे व्यवस्थापन कसे करावे याही बाबी त्यांनी सांगितल्या स्नेहल मॅडम यांनी मुलींसाठी खास वर्गामध्ये त्यांचे अडीअडचणी वाढत्या वयामध्ये येणारे आव्हाने व मानसिक दृष्ट्या आपण सक्षम कसं व्हायचं याबद्दल सविस्तर माहिती त्यांनी सांगितली मुख्याध्यापक श्री डाके श्याम सर यांनी सर्वांचा शाल श्रीफळ देऊन पुष्पगुच्छ देऊन विद्यालयाकडून सत्कार केला श्री काशीद गणेश सर यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले कार्यक्रमाचे आभार श्री शिवाजी पवार सर यांनी मानले या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिक्षक श्री लहाने श्रीहरी मुख्यमंत्री कार्य प्रशिक्षक श्री घोडके सर सेवक काटवटे सेवक काळे इत्यादींनी अटक परिश्रम घेतले व कार्यक्रमाची सांगता चहा पानाने झाली

## मस्साजोग घटना अमानविय असून आरोपींना फाशी द्यावी

**पप्पु कागदेंचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन**

बीड । प्रतिनिधी केज तालुक्यातील मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांची हत्या अमानविय असून घटनेतील सर्व दोषींना कठोर शिक्षा व्हावी. तसेच परभणी येथे माथेफीरुने संविधानाची विटंबना केली आहे. त्याच्या-वर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्यात यावा. परभणी पोलिस आंबेडकरी वस्त्यांमध्ये कोबिंग ऑपरेशन करुन तरुणांवर गुन्हे दाखल करत आहेत. हा प्रकार तातडीने थांबविण्यात यावा.आशा मागणीचे निवेदन युवा रिपाइं प्रद-`शाध्यक्ष तथा बीड जिल्हाध्यक्ष पप्पु कागदे यांनी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना त्यांच्या सागर निवासस्थान, मुंबई येथे शनिवार (ता.१४) रोजी दिले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिलेल्या निवेद-नात म्हटले आहे की, केज तालुक्यातील मस्साजोग येथील माजी सरपंच संतोष देशमुख यांचे अपहरण करुन त्यांची अमानविय हत्या घडवून आणली आहे.परिणामी जिल्ह्यासह राज्याचे वातावरण ढवळून निघाले आहे.त्यामुळे संतोष देशमुख यांच्या हत्येतील सर्व दोषींना कठोर शिक्षा होण्यासाठी तपास पारदर्शकपणे केला जावा.त्याचबरोबर या प्रकरणात दिरंगाई करणाऱ्या पोलि-सांवर देखील कडक कारवाई करण्यात यावी. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिलेल्या निवेदनात पप्पु कागदे यांनी असंही म्हंटले आहे की, परभणी जिल्ह्यात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळा परिसरात असलेल्या संविधान प्रतिची एका माथेफीरुन विटंबना केली आहे.त्याच्यावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्यात यावा.कारण संविधान देशाच्या सर्वोच्चस्थानी आहे, जर कोणत्याही व्यक्तीकडून संविधानाचा अवमान होत असेल तर त्याची गय केली जाऊ नये.अशी मागणी केली असून पोलिसांकडून आंबेडकरी वस्त्यांमध्ये सुरू असलेले कोंबिंग ऑपरेशन आणि नाहक दाखल झालेले गुन्हे मागे घेण्यात यावेत. अशी मागणी मुख्यमंत्री यांना दिलेल्या निवेदनात पप्पू कागदे यांनी केली.

## उपजिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी महेंद्रकुमार कांबळे यांची श्री सिद्धेश्वर महाविद्यालयास सदिच्छा भेट

माजलगाव प्रतिनिधी दिनांक १३/१२/२०२४बीड येथील निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी महेंद्र कुमार कांबळे यांनी आज श्री सिद्धेश्वर महाविद्यालयास सदिच्छा भेट दिली. याप्रसंगी महाविद्यालयाने लोकसभा व विधानसभा निवडणूक २०२४ मध्ये केलेल्या उल्लेखनीय कामांचे सादरीकरण त्यांच्यासमोर करण्यात आले. महेंद्रकुमार कांबळे यांनी निवडणूक कार्यामध्ये महाविद्यालयाने केलेल्या कार्याची प्रशंशा व भरभरून कौतुक केले. या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुहास मोराळे यांनी त्यांचे स्वागत केले.

यामध्ये सार्वत्रिक लोकसभा निवडणूक २०२४ व महाराष्ट्र विधानसभा निवडणूक २०२४ मध्ये महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना, राज्यशास्त्र व आय. सी. सी. विभागाकडून मतदार नोंदणी, महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची मतदार नोंदणी, पथनाट्य, मतदार जागृती अभियान, स्वाक्षरी मोहीम, प्रश्नमंजुषा, मतदार जागृती विषयक शपथ , रांगोळी स्पर्धा , एतच डेमो या सर्व कार्याचा आढावा त्यांच्यासमोर मांडण्यात आला. व त्यांनी याप्रसंगी म हाविद्यालयाच्या कार्याचे भरभरून कौतुक केले. त्यांनी याप्रसंगी महाविद्यालयात सुरु असलेल्या आरोग्य शिबिरास भेट दिली . याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुहास मोराळे, डॉ साधना घडसिंग , डॉ. रमेश गटकळ, ग्रंथपाल सुरेश बनसोडे, कार्यालय अधीक्षक श्री. विजय कुलकर्णी, वरिष्ठ लिपिक सौ. स्वाती धर्माधिकारी, श्री. उत्तरेश्वर आनेवार आदी उपस्थित होते.

# राज्य मंत्रिमंडळाचा विस्तार ३९ जणानी घेतली शपथ

नागपूर दि.१५ (वृत्तसेवा): महायुतीच्या मंत्रिमंडळ विस्तारात प्रादेशिक आणि जातीय संतुलनावर भर दिल्याचं दिसत आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका समोर ठेवून काही चेहरे मंत्रिमंडळात घेण्यात आले आहेत. देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील राज्य मंत्रिमंडळाचा विस्तार आज नागपूरच्या राजभवनात पार पडला. महाराष्ट्र विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन आज १६ डिसेंबरपासून सुरू होत असताना एक दिवस आधी हा शपथविधी सोहळा घेण्यात आला. १९९१ नंतर प्रथमच नागपुरात मंत्र्यांचा शपथविधी झाला असून राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांनी नवीन ३९ मंत्र्यांना पद व गोपनीयतेची शपथ दिली मंत्रिमंडळात कोणकोणत्या नेत्यांना स्थान- १.चंद्रशेखर बावनकुळे (भाजप) २.राधाकृष्ण विखे-पाटील (भाजप) ३.हसन मुश्रीफ (राष्ट्रवादी-अजित पवार) ४.चंद्रकांत पाटील (भाजप) ५. गिरीश महाजन (भाजप) ६.गुलाबराव पाटील (शिवसेना-एकनाथ शिंदे) ७.गणेश नाईक (भाजप) ८.दादा भुसे (शिवसेना-एकनाथ शिंदे) ९.संजय राठोड (शिवसेना-एकनाथ शिंदे) १०.धनंजय मुंडे (राष्ट्रवादी-अजित पवार) १०.धनंजय मुंडे (राष्ट्रवादी-अजित पवार)१०.धनंजय मुंडे (राष्ट्रवादी-अजित पवार) ११.मंगलप्रभात लोढा (भाजप) १२.उदय सामंत (शिवसेना-एकनाथ शिंदे) १३.जयकुमार रावल (भाजप) १४.पंकजा मुंडे (भाजप) १४.पंकजा मुंडे (भाजप)१४.पंकजा मुंडे (भाजप) १५.अतुल सावे (भाजप) १६.अशोक उईके (भाजप) १७.शंभूराज देसाई (शिवसेना-एकनाथ शिंदे) १८.आशिष शेलार (भाजप) १९.दत्तात्रय भरणे (राष्ट्रवादी-अजित पवार) २०.आदिती तटकरे (राष्ट्रवादी-अजित पवार) २१.शिवेंद्रसिंहराजे भोसले (भाजप) २२.माणिकराव कोकाटे (राष्ट्रवादी-अजित पवार) २३.जयकुमार गोरे (भाजप) २४.नरहरी झिरवळ (राष्ट्रवादी-अजित पवार) २५.संजय सावकारे (भाजप) २६.संजय शिरसाट (शिवसेना-एकनाथ शिंदे) २७.प्रताप सरनाईक (शिवसेना-एकनाथ शिंदे) २८.भरत गोगावले (शिवसेना-एकनाथ शिंदे) २९.मकरंद पाटील (राष्ट्रवादी-अजित पवार) ३०.नितेश राणे (भाजप) ३१.आकाश फुंडकर (भाजप) ३२.बाबासाहेब पाटील (राष्ट्रवादी-अजित पवार) ३३.प्रकाश आबिटकर (शिवसेना-एकनाथ शिंदे) ३४.माधुरी मिसाळ (भाजप) ३५.आशिष जैस्वाल (शिवसेना-एकनाथ शिंदे) ३६.पंकज भोयर (भाजप) ३७. मेघना बोर्डिकर (भाजप) ३८.इंद्रनील नाईक (राष्ट्रवादी-अजित पवार) ३९.योगेश कदम (शिवसेना-एकनाथ शिंदे)

## अखेर अनाधिकृत बॅनर प्रकरणी बीड नगरपालिके कडुन २१ जणांविरोधात गुन्हा दाखल ; कारवाईत सातत्य हवे :- डॉ.गणेश ढवळे

बीड:- ( दि.१५ ) बीड शहरात राजकीय नेते, कार्यकर्ते, व्यावसायिक आदिंनी आपापल्या वेगवेगळ्या जाहिरातीचे अनाधिकृत बॅनर लावून सुंदर शहराला विद्रूप केले होते.तसेच छत्रपती शिवाजी महाराज चौकात लावण्यात आलेल्या बॅनर मुळे वाहतुकीस अडथळा व अपघाताच्या घटना घडलेल्या आहेत. याविरोधात शहर विद्रुपीकरण कायद्यांतर्गत कारवाई करण्यात यावी यासाठी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे यांनी सहका-यांसमवेत दि.२ डिसेंबर रोजी छत्रपती शिवाजी महाराज चौकात निदर्शने केली होती. मागील काही वर्षांपासून शहरात विनापरवाना बॅनर लावण्याचा पायंडाच पडला होता. नेत्यांच्या निवडी, शहरात स्वागत ,उत्सव, वाढदिवस आदी कार्यक्रमांच्या शुभेच्छांचे बॅनर लावले जात होते. अनाधिकृत बॅनर हटवावेत यासाठी सामाजिक कार्यकर्ते वारंवार निवेदने आणि आंदोलनाच्या माध्यमातून नगरपालिका प्रशासनाकडे कारवाईची मागणी



करत होते.परंतु ठोस कारवाई करण्यात येत नसे आंदोलनानंतर बॅनर काढण्याचे नाटक करण्यात येई आणि दुस-या दिवशी पुन्हा बॅनर लावलेले दिसत असत.अखेर नगर पालिकेने कठोर पावले उचलत दि.१२ गुरूवार रोजी एकाच दिवशी ३ पोलिस ठाण्यात तब्बल २१ जणांविरोधात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

**यांच्यावर झाला गुन्हा दाखल**

स्वच्छता निरीक्षक शशिकांत जोगदंड यांच्या फिर्यादीवरून शिवाजीनगर पोलिस ठाण्यात सुदर्शन सुभाष बांगर,उमेश शहादेव फड,यादव चव्हाण, संकेत जाधव,सुमित उजगरे, जालिंदर हिरवे,दिपक चांदणे यांच्या विरोधात गुन्हा दाखल झाला आहे. सुनिल काळकुटे यांच्या फिर्यादीवरून पेठ बीड पोलिस ठाण्यात संकेत जाधव,रोहन गायकवाड, विलास जोगदंड यांच्या विरोधात तर भागवत जाधव यांच्या फिर्यादीवरून संकेत जाधव,दत्ता पगळ,अक्षय चांदणे, सुमित उजगरे,पंकज खुपसे,अक्षय चांदणे,अजय सुरवसे, राहुल इंगळे, जालिंदर हिरवे,दीपक चांदणे बीड शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आवाहन करून बॅनर जप्तीची कारवाई करूनही पुन्हा अनाधिकृत बॅनर लावणारांवर गुन्हे दाखल करण्याच्या सूचना दिल्या **:- निता अंधारे मुख्याधिकारी नगरपरीषद बीड**

विना परवाना बॅनर लाऊ नये असे आवाहन करण्यात आले होते.पहिल्यांदा बॅनर जप्तीची कारवाई करण्यात आली होती.परंतु त्यानंतरही काही लोकांनी विना परवाना बॅनर लाऊन शहराचे विद्रुपीकरण करणे सुरूच ठेवले होते.त्यामुळे सर्व स्वच्छता निरीक्षकांना सुचना करून गुन्हे दाखल करण्याच्या सुचना दिल्या.नागरीकांनी सहकार्य करावे असे आवाहन निता अंधारे मुख्याधिकारी नगरपरीषद बीड यांनी केले आहे.

**राजकीय नेते कार्यकर्त्यांना आवाहन ; नगरपालिकेकडुन कारवाईत सातत्य हवे :- डॉ.गणेश ढवळे**

राजकीय नेते आणि कार्यकर्ते यांना आवाहन करण्यात येत असुन निदान छत्रपती शिवाजी महाराज चौकातील वाहतूकीस अडथळा असणारे व अपघाताला निमंत्रण ठरणारे बॅनर लाऊ नयेत तशा सुचना सर्वंच राजकीय पक्षांच्या नेत्यांनी त्यांच्या कार्यकर्त्यांना द्याव्यात असे आवाहन डॉ.गणेश ढवळे यांनी केले असुन बीड नगर परिषदेनेही कोणताही दुजाभाव न करता कारवाईत सातत्य ठेवावे अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

## काझी सेवा संघाच्या पदाधिका-यांनी घेतली ज्येष्ठ पत्रकार काझी हयातुल्ला यांची भेट

गेवराई, १५ (लोक इच्छा प्रतिनिधी) - महाराष्ट्र राज्य काझी सेवा संघाच्या पदाधिका-यांनी मार्गदर्शन घेण्यासाठी जेष्ठ पत्रकार काझी हयातुल्ला यांची नुकतीच सदिच्छा भेट घेतली. यावेळी सर्व पदाधिका-यांनी त्यांच्या प्रकृतीची आस्थेवाईकपणे चौकशी केली व त्यांच्या दीर्घायुरारोग्यासाठी प्रार्थना केली. याप्रसंगी काझी हयातुल्ला यांचे जेष्ठ चिरंजीव तथा काझी सेवा संघाचे गेवराई तालुकाध्यक्ष पत्रकार काझी अमान हे उपस्थित होते. काझी सेवा संघाचे महाराष्ट्र राज्य कार्याध्यक्ष काझी अबुतालेब, नाशिक जिलाध्यक्ष काझी सोहेल, बीडचे उपजिल्हाध्यक्ष काझी बाबाभाई, नाशिकचे शेख वसीम, चांदवडचे शेख शाहनवाज, शेख दानिश आदी पदाधिका-यांनी गेवराई येथे भेट घेतली . याप्रसंगी काझी यांनी सेवा संघाच्या कार्याचे कौतुक करून काझी सेवा संघास सर्वांनी सहकार्य करावे, असे आवाहन केले व संघास आशिर्वाद दिले. याप्रसंगी काझी काझी सेवा संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष काझी अकबर अली, राज्य सचिव डॉ. काझी रफीक राही, राज्याध्यक्ष काझी मुहम्मद शफी, राज्य कार्याध्यक्ष काझी अबूतालेब, बीड जिल्हाध्यक्ष काझी मोईनोद्दीन आदी प्रमुख पदाधिका-यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्र राज्यातील काझी समाजाचे सर्वेक्षण करण्यात आले असून या समाजाच्या उन्नतीसाठी प्रयत्न केले जात आहेत. महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्डामध्ये नोकर भरतीच्या पूर्वतयारीसाठी काझी सेवा संघाच्यावतीने मोफत क्लासेस घेण्यात आले. काझी सेवा संघाचे राज्याध्यक्ष काझी मुहम्मद शफी हे बीड येथे गेल्या अनेक वर्षांपासून अल्कबीर नावाची बिनव्याजी बँक चालवीत



असून या बँकेमार्फत व्यापा-यांना बिनव्याजी कर्ज देऊन अर्थसहाय्य केले जात आहे. तर बेरोजगार युवकांना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठीही बिनव्याजी कर्ज दिले जात आहे. बीड, औरंगाबाद, परभणी जिल्ह्यात तसेच गेवराई, माजलगाव, अंबाजोगाई, परळी या तालुक्यातही अलकबीर बँकेच्या शाखा स्थापन करण्याचा त्यांचा मनोदय आहे. काझी सेवा संघाच्यावतीने यूपीएससी व एमपीएससी परीक्षेच्या पूर्वतयारीसाठी लवकरच बीड जिल्ह्यात मोफत क्लासेस सुरू करण्यात येणार असल्याची माहिती काझी सेवा संघाचे राज्य कार्याध्यक्ष काझी अबूतालेब यांनी यावेळी दिली.

## आसरडोह ओबीसी घरकुलात मोठा भ्रष्टाचार

**चौकशी करून गुन्हा दाखल करा अन्यथा अमरण उपोषण-अरुण तोडकर**

बीड । प्रतिनिधी धारूर तालुक्यातील आसरडोह येथे ओबीसी प्रवर्गातील घरकुलामध्ये प्रचंड प्रमाणात भ्रष्टाचार झाला असून गावचा ग्रामसेवक पंचायत समीतीचा इंजिनियर आणि विस्तार अधिकारी यांनी संगनमत करून घरकुलांचे कसलेही बांधकाम न करता मलीदा लाटला आहे. गटविकास आधिकारी पंचायत समिती धारूर यांना दिलेल्या लेखी निवेदनात अरुण तोडकर यांनी म्हटले आहे कि, ओबीसी घरकुलांचे पात्र लाभार्थ्यांच्या खात्यात दोन दोन हप्ते जमा झाले खरे मात्र त्यांनी कुठल्याही घरकुलाचे कसलेही बांधकाम केलेले नाही तरीही त्यांच्या खात्यात हप्ते जमा झाले कारण प्रत्येक हप्त्या पोटी लाभार्थ्याकडून पाच पाच हजार रुपये घेतल्या मुळे असरडोह येथे हा चमत्कार घडु शकला आणि सरकारी अधिकाऱ्याच्या खाबुगीरी मुळे घरकुलांचे बोगस हप्ते लाभार्थ्यांना मिळाले, ही बाब अत्यंत गंभीर स्वरूपाची असून ग्रामसेवक व पंचायत समितीच्या इंजिनियर व इतर आधिकाऱ्यामुळे शासनाच्या घरकुल योजना उद्देशाला काळीमा फासला गेला आहे शेकडो घरकुलात प्रतिहप्ता पाच हजार या प्रमाणे आसरडोह येथे लाखो रुपयाचा भ्रष्टाचार झाला असून या गंभीर प्रकरणाची चौकशी करून संबंधित भ्रष्ट आधिकाऱ्यावर योग्य ती उचित कारवाई करावी अन्यथा मी दि २६ जानेवारी २० २५ रोजी आत्मदहन करील असा इशारा निवेदनातून अरुण तोडकर यांनी दिला आहे असा कुठला



# शासकीय अधिकाऱ्यांनी कामाबाबत सकारात्मकता दाखवून गेल्या दहा वर्षातील रेंगाळलेली कामे तातडीने पूर्ण करावीत

## नवनिर्वाचित आ. सुरेश धस यांची विकास आढावा बैठकीत सूचना

आष्टी । प्रतिनिधी सन २०१४ पासून आष्टी पाटोदा आणि शिरूर तालुक्यातील शेतकऱ्यांच्या हिताची अनेक कामे रखडली असून या कामांना प्राधान्याने गती देऊन ही कामे पूर्ण करावीत..यासाठी शासकीय अधिकाऱ्यांनी कामात सकारात्मकता दाखवावी विकास कामे करताना कोणताही भेदभाव न ठेवता कठोर भूमिका ठेवून काम करा तुम्हाला काम करताना काही अडचणी आल्यास मी तुमच्या पाठीमागे खंबीर उभा आहे मात्र तुम्ही देखील आपले कर्तव्य पार पाडण्यासाठी सतर्क रहावे अशा सूचना नवनिर्वाचित आमदार सुरेश धस यांनी आष्टी पाटोदा आणि शिरूर तालुक्यातील सर्व खाते प्रमुखांच्या विकास आढावा बैठकीमध्ये दिल्या. या बैठकीसाठी उपविभागीय अधिकारी नजमा शेख यांच्यासह आष्टी, पाटोदा,आणि शिरूर का.येथील तहसीलदार, गटविकास अधिकारी, दुय्यम निबंधक, पोलीस निरीक्षक, गटशिक्षण अधिकारी, तालुका कृषी अधिकारी, पाटबंधारे, बांधकाम, ग्रामीण पाणीपुरवठा, पाटबंधारे, या विभागांचे उप अभियंता आणि इतर सर्व खाते प्रमुख उपस्थित होते पुढे बोलताना..आ.सुरेश धस म्हणाले की, आष्टी तालुक्यातील खुंटेफळ साठवण तलाव हा माझा महत्त्वाकांक्षी प्रकल्प असून शेतकऱ्यांच्या जीवनामध्ये वरदान ठरणारा प्रकल्प आहे गेल्या दहा वर्षांमध्ये आवश्यक त्या गतीने कामे झाली नाहीत ती आता तातडीने पूर्ण करावयाची आहेत पाटोदा आणि शिरूर तालुक्यातील असलेले सिंदफणा मध्यम प्रकल्प, उखळवाडी कारेगाव पांगरी जाधववाडी या तलावांची उंची वाढवण्याचे काम २०१४ पासून रखडलेले आहे ही कामे वेगाने पूर्ण करण्यासाठी आवश्यक असलेले संयुक्त मोजणी आणि इतर कामे संबंधिताने तातडीने करावीत. पैठण पंढरपूर राष्ट्रीय महामार्गावरील भूसंपादनाची अनेक प्रकरणे प्रलंबित असल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये जमिनीचा मोबदला न मिळाल्यामुळे असंतोष आहे या कामी तात्काळ लक्ष देण्याची आवश्यकता असल्याचे सांगून शिरूर तालुक्यातील संजय गांधी निराधार योजनेच्या लाभार्थ्यांमध्ये मोठा घोटाळा असून त्याची चौकशी करून या भ्रष्टाचारामध्ये सहभागी असणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई प्रस्तावित करणार असल्याचे त्यांनी सांगितले आष्टी तालुक्यातील ठोंबळ सांगवी आणि गहूखेल येथील प्रकल्पाचेही काम २० १४ पासून रखडलेले आहे या प्रकल्पांचे संयुक्त मोजणी अहवालाचे गावामध्ये जाहीर वाचन करण्यात यावे गोरगरीब शेतकऱ्यांचे भूसंपादनाचे पैसे लवकर मिळतील याकडे लक्ष द्यावे आष्टी तालुक्यातील ४६ किलोमीटर अंतराच्या गावांमधून जाणारा सुरत चेन्नई या राष्ट्रीय महामार्गावरील १९ गावांमधील शेतकऱ्यांच्या भूसंपादनाबाबत तक्रारी प्राप्त आहेत त्याची देखील शहानिशा करून या रस्ता कामाच्या संयुक्त मोजणी अहवालाची चौकशी करण्यात यावी अशी त्यांनी मागणी केली शासनाच्या विकास कामांमध्ये स्वार्थासाठी आड येणाऱ्या कोणाचाही मुलाहिजा न ठेवता अधिकाऱ्यांनी कठोर कारवाई करून वेळप्रसंगी गुन्हे दाखल करावेत असे सांगितले. सर्व शासकीय कार्यालयांमध्ये स्वच्छता ठेवावी खाते प्रमुखांनी याकडे प्राधान्याने लक्ष द्यावे आष्टी ग्रामीण रुग्णालयामध्ये गेल्या काही वर्षांमध्ये सिजेरियन मोठ्या प्रमाणावर करण्यात आल्यामुळे गोरगरीब सर्वसामान्य रुग्णांना त्याचा लाभ मिळाला होता परंतु अलीकडच्या काळामध्ये हे प्रमाण कमी झाल्याबद्दल त्यांनी खेद व्यक्त केला ग्रामीण पाणीपुरवठा विभागाच्या अंतर्गत असलेल्या जलजीवन योजनेअंतर्गत सर्वात जास्त योजना आष्टी मतदार संघात असून अधिकाऱ्यांनी या सर्व योजना दर्जेदार करून नळाद्वारे नागरिकांना पाणी मिळावे ज्या कामांमध्ये हलगर्जीपणा झाला आहे ते काम पूर्ण करून घ्यावे निधीची काळजी करू नका मी निधीची व्यवस्था करतो तुम्ही मात्र कामे चांगल्या पद्धतीने पूर्ण करा अशा सूचना दिल्या आष्टी येथील खाजगी कोचिंग क्लासेस आणि कन्या शाळा परिसरातील रोड रोमि यांचा बंदोबस्त करण्यात यावा यासाठी दामिनी पथक तयार करून प्रभावी पद्धतीने या रोड रोमिओ वर कारवाई करावी असे सांगून आपल्या हद्दीतील हातभट्टी ताडी अमली पदार्थ विक्री होऊ नय यासाठी कठोर कारवाई करण्याचे सांगितले सध्या शेतकऱ्यांचा महत्त्वाचा प्रश्न म्हणजे पुरेसा दाबाने वीज उपलब्ध होत नसल्याने वीज वितरण विभागाने तातडीने सर्वेक्षण करून किती ट्रान्सफॉर्मर्स लागतील याची माहिती द्यावी शेतकऱ्यांना पुरेशा दाबाने आणि नियमित वीज उपलब्ध करून देण्यात येईल असे आश्वासन त्यांनी यावेळी दिले. त्याचबरोबर आष्टी पाटोदा आणि शिरूर तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या शाळेच्या विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी शैक्षणिक गुणवत्ता अभियान राबविण्यात येणार असून यासाठी तात्कालीन विभागीय आयुक्त व्ही रमणी पॅटर्न सुरू करण्यात येणार असून गोरगरीब शेतकरी शेतमजुरांच्या आर्थिक दृष्ट्या दुर्बल असणाऱ्या पालकांच्या मुलांसाठी हा पॅटर्न राबविण्यात येणार असून त्यासाठी शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांना उपविभागीय अधिकारी सर्व तहसीलदार सर्व गट विकास अधिकारी गटशिक्षणाधिकारी आणि तज्ञ शिक्षकांची मदत घेण्यात यावी अशी ही सूचना त्यांनी यावेळी केली



दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

सोमवार १६ डिसेंबर २०२४
https://lokaarambh.com



# संवेदना शून्य महायुती सरकार, आंदोलकांचा जीव जातोय, लोकप्रतिनिधींवर हल्ले होताय

## आपण कसेही वागलो तरी आपण निवडून येऊ हा अहंकार आज या सरकारमध्ये आहे



बीडच्या केज तालुक्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येची घटना आणि परभणीतील पोलीस कोठडीत एका आंदोलकाचा झालेला मृत्यू, या दोन घटनांवरुन विरोधकांकडून महायुती सरकारवर निशाणा साधला जातोय. काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी महायुतीवर सडकून टीका केली आहे. ङ्कशाहू, फुले, आंबेडकरांच्या पुरोगामी महाराष्ट्रात संविधानाची विटंबना झाली. यानंतर आंबेडकरी जनतेने आंदोलनं केले. त्यानंतर कोम्बिंग ऑपरेशनच्या माध्यमातून सरकारकडून कारवाई करण्यात आली. अनेक कार्यकर्त्यांना मारहाण झाली, धरपकड करण्यात आली. त्यातील एका कार्यकर्त्याचा कोठडीत मृत्यू झाला, हे संतापजनक आहे. सरकारने या प्रकरणाची सखोल चौकशी करणे गरजेचे आहे. परंतु असे होईल का याबाबत शंका आहे. कारण बीडमध्ये सरपंचाचे अपहरण करून त्याची निर्घृणरित्या हत्या करण्यात झाली. सरपंचाच्या कुटुंबाला न्याय देणे सोडून ह्यातील आरोपीला राजकीय वरदहस्त वापरून आश्रय देणा-यांना महायुती सरकार मंत्री करत आहेङ्क, असा घणाघात विजय वडेट्टीवार यांनी केला.

ङ्कत्यामुळे परभणी प्रकरणात न्याय मिळेल का? हा प्रश्न आहे. संवेदना शून्य महायुती सरकार आज आपल्या विजयाच्या धुंदीत मग्न आहे. आंदोलकांचा जीव जातोय, लोकप्रतिनिधींवर हल्ले होताय तरी स्वतःच्या मिरवणुकीत सरकार व्यस्त आहे. आपण कसेही वागलो तरी आपण निवडून येऊ हा अहंकार आज या सरकारमध्ये आहे. सरकारने बहुमताचा अहंकार बाजूला ठेवून भीमसैनिक सोमनाथ सुर्यवंशी यांच्या मृत्यूची निष्पक्ष चौकशी करावी ही आमची मागणी आहेङ्क, असं विजय वडेट्टीवार म्हणाले आहेत.

## रोहित पवार काय म्हणाले?


आमदार रोहित पवार यांनीदेखील बीडच्या घटनेवरुन महायुतीवर टीका केली आहे. ङ्कआदरणीय फडणवीस साहेब, बीड जिल्ह्यातील युवा सरपंचाची दिवसा ढवळ्या हत्या होऊनही हत्येचा मास्टरमाईंड अद्यापही मोकाट आहे. केवळ राजकीय लागेबांधे किंवा राजकीय वरदहस्त आहे म्हणून गुन्हेगारांना मोकाट सोडणे योग्य होणार नाही. बीड जिल्ह्यात गेल्या वर्षभरात ३६ खून, १६८ खुनाचे प्रयत्न, १५६ महिलांवर बलात्कार, ३८६ विनयभगंग झाले आहेत, गुन्हेगारांच्या दहशतीने असे अनेक गुन्हे तर पुढंही आलेले नाहीत. बीडमधील वाढती गुन्हेगारी आणि गुन्हेगारीला मिळणारा राजाश्रय अतिशय धोकादायक असून याकडे सर्व बंधने तोडून केवळ माणूस म्हणून बघणे गरजेचे आहेङ्क, असं रोहित पवार म्हणाले.सरकारने आता गुन्हेगारांवर कठोर कारवाई न केल्यास महाराष्ट्रात ङ्कगँग्स ऑफ वासेपूरफसारखी परिस्थिती निर्माण होण्यास वेळ लागणार नाही. आपण गृहमंत्री म्हणून पदभार घेतल्यानंतर राजकीय तडजोडी बाजूला सारून दोषींवर कारवाई करत गुन्हेगारांना संदेश देण्याची गरज आहे आणि तो संदेश आपण द्याल, ही अपेक्षाङ्क, असं रोहित पवार म्हणाले.

# हदगाव हिमायतनगर मतदारसंघातील अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना नैसर्गिक आपत्ती नुकसान भरपाई मंजूर



नांदेड । प्रतिनिधी सप्टेंबर २०२४ मध्ये अतिवृष्टी व पूर परिस्थितीमुळे नुकसान झालेल्या बाधित क्षेत्रासाठी राज्य सरकारकडून जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी नुकसान भरपाई मंजूर झाली आहे,ही रक्कम जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या थेट बँक खात्यात डीबीटीद्वारे जमा करण्यात येणार आहे, शेतकऱ्यांनी आपल्या बँक खात्याची तात्काळ ई केवायसी पूर्ण करावी असे आवाहन भारतीय जनता पार्टीचे मंडळ प्रभारी तथा संजय गांधी निराधार अनुदान योजना समितीचे अध्यक्ष भागवत देवसरकर यांनी केली आहे. सप्टेंबर महिन्यात नांदेड जिल्ह्यासह हादगाव हिमायतनगर तालुक्यात अतिवृष्टीमुळे पिकाचे नुकसान होऊन शेतकऱ्यांना मोठा आर्थिक फटका बसला होता,खरीप हंगामातील पिकाला मोठा फटका बसल्याने शेतकरी अस्मानी संकटात सापडला होता, यावेळी भागवत देवसरकर यांनी जिल्हा प्रशासनांने नुकसानग्रस्त पिकाची पाहणी करून नुकसानीचे पंचनामे करून राज्य सरकारकडे मदतीसाठी अहवाल पाठवावा अशी मागणी केली होती व तातडीने मदत मिळण्यासाठी तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे, तत्कालीन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,अजित पवार, तत्कालीन महसूलमंत्री राधाकृष्ण विखे पाटील,तत्कालीन कृषी मंत्री धनंजय मुंडे, तत्कालीन मदत व पुनर्वसनमंत्री अनिल पाटील यांच्याकडे वारंवार पाठपुरावा केला होता. राज्य सरकारकडून अतिवृष्टीने नुकसान झालेल्या हदगाव तालुक्यातील ७४ हजार २२८ बाधित शेतकऱ्यांसाठी ८२ कोटी २७ लाख व हिमायतनगर तालुक्यातील ३४ हजार ५३३ बाधित शेतकऱ्यांसाठी ४४ कोटी ६१ लाख रुपये मंजूर झाले आहेत,लवकरच दोन्ही तालुक्यातील शेतकऱ्यांच्या थेट बँक खातात रक्कम जमा होणार, शेतकऱ्यांनी आपल्या बँकखात्याची त्वरित शझूल करून घ्यावी, तसेच प्रशासनाने राज्यसरकार कडून आलेले अनुदान तात्काळ शेतकऱ्यांच्या खात्यात वर्ग करावे अशी मागणी भागवत देवसरकर यांनी केली आहे.

# वाळूज परिसरातून विवाहिता दोन चिमुकल्यासह बेपत्ता



बीड । प्रतिनिधी वाळूज पोलिस ठाण्याच्या हद्दीतून २८ वर्षीय महिला आपल्या दोन चिमुकल्यांसह बेपत्ता झाल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणी पती हकीम शेख यांनी वाळूज पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. बेपत्ता झालेल्या महिलेचे नाव शेख फरजाना (वय २८) असून तिच्यासोबत मुलगा फैजान (वय ७) आणि मुलगी माहीन (वय ५) हेही २८ नोव्हेंबर २०२४ रोजी दुपारी अचानक बेपत्ता झाले आहेत. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस हवालदार के. बी. जाधव करत आहेत. पोलिसांनी नागरिकांना सहकार्याची विनंती केली असून, संबंधित महिला व मुलांचे कुठेही अंशदर्शन झाल्यास तातडीने पोलिसांशी संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे

# रानडुकरांच्या धुमाकुळाने शेतकरी त्रस्त; प्रशासनाने बंदोबस्त करावा -शिवराम राऊत

शिरूर । प्रतिनिधी बीड जिल्ह्यातील सर्वाधिक कपाशीची लागवड करणारा शिरुर तालुक्यात ऑगस्ट- सप्टेबंर महिन्यातील अति पावसाने खरिप हंगामी लागवड असणारे कपाशी,सोयाबिन,व तुर पीकांचे अधिकचे नुकसान झाल्याने व पर्जन्यमान व परतीच्या पावसामुळे तालुक्यातील रब्बी हं.पीकांची लागवड क्षेत्रात वाढ होऊन ज्वारी,भूईमुग,मका,कांदा, हरभरा,असी पीक क्षेत्रात लागवड आहे.पीक देखील जोमात आहेत.परंतु अनेक शेतक-यांच्या पीकांची नासाडी होत आहे.थंडीचे प्रमाण वाढल्याने व रानडुकरांचा धुमाकुळ अधिक होऊन उभ्या ज्वारीचे मधुनच टुकडे पाडणे,कणसे चघळणे,भूईमुग उकरणे,हरभरा उपकरणे,मक्याची नासधुस करण्याचे प्रतिदिन प्रमाण वाढल्याने शेतकरी हैराण आहेत.त्यासाठी शेतकरी विविध उपाययोजना करत आहेत परंतु रानडुकरांचा प्रादुर्भाव कमी होत नसल्याने दुसाट्याची पीके वाया जात आहेत.त्यामुळे शेतकरी हवालदिल होऊ लागल्याने प्रशासनाने यावर उपाय योजना करण्याची शेतकरी वर्गातून मागणी वाढत आहे.तसेच या पुर्वी देखील शिवश्री कृषि मंडळ हिवरसिंगा यांच्या वतीने अध्यक्ष यांनी मा.कृषिमंत्री श्री.धनंजय मुंडे यांची भेट घेऊन शेतक-यांच्या पीकांचे रानडुकरे,हरणे,व इतर प्राण्यापासुन संरक्षण करण्यासाठि अनुदानित सौरकुंपन,अथवा काटेरी कुंपण योजना राबवण्यासाठी विनंती केली होती.या नंतरच्या काळात देखील कृषिमंडळ या मागणीचा पाठपुरावा करून शेतक-यांच्या पीक संरक्षण करण्यासाठी तसेच चंदन,औषधी वनस्पती व इतर पीके नुकसान पातळी कमी होण्यासाठी प्रयत्न करणार आहे.तरी रब्बी हंगामी पीके धोक्यात आहेत पंरतू या रांडुकरामुळे शेतक- यांवर देखील जीवितास धोका निर्माण होत आहे. शेतक-यांवर रात्रीचे राखणी करण्याचा त्रास वाढला आहे.रात्रीच्यावेळी शेतक-यांना समुहानेच फिरावे लागत आहे. अनेक ठिकाणी तात्पुरती तार लाऊन विद्युत करंट सोडण्याचे प्रमाण वाढल्याने देखील अपघाताचे प्रमाण वाढत आहे. करिता शेतकरी व त्यांचे रब्बी हंगामी पीके वाचवण्यासाठी प्रशासनाने डुकरांचा बंदोबस्त करणे आवश्यक आहे.असे शिवराम राऊत यांनी कळवले आहे.

आधुनिक शेतीतील यांत्रिकीकरणात कौशल्याला विशेष महत्व असुन या प्रशिक्षणामुळे रोजगार उपलब्ध होउन शेतीसाठी कौशल्यपुर्ण यांत्रिकीकरण फायद्याचे ठरणार असल्याचे त्यांनी सांगितले. अध्यक्षीय समारोपानंतर तांत्रीक सत्रात डॉ. स्मिता सोळंके (कृषीयंत्र व शक्ती विभाग, वनामकृवि, परभणी) यांनी विद्यापीठ विकसीत विविध बैल चलित तसेच ट्रॅक्टरचलित औजारांची माहिती दिली. पेरणी दरम्यान विशेषतः रुंद वरंबा सरी टोकण यंत्राची जोडणी बाबत चालकाच्या अडचणी वरील उपाय योजना सांगण्यात आल्या.

# लोहा-कंधार तालुक्यात अतिवृष्टीग्रस्तांसाठी १५५ कोटी मंजूर

कंधार। प्रतिनिधी सप्टेंबर २०२४ मध्ये अतिवृष्टी व पूर परिस्थितीमुळे ३३ टक्केच्या वर नुकसान झालेल्या बाधित क्षेत्रासाठी शासनाकडून ८१२ कोटी रुपये नुकसान भरपाई मंजूर झाली आहे. ही रक्कम जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या बँक खात्यात डीबीटीद्वारे थेट जमा करण्यात येणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी ई-केवायसी प्रक्रीया पूर्ण करावी, असे आवाहन आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी केले आहे . सप्टेंबर महिन्यात जिल्ह्यासह कंधार आणि लोहा तालुक्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले होते. खरीप पिकाला मोठा फटका बसल्याने शेतकरी हवालदार झाला होता अशा परिस्थितीत आसमानी संकटात अडकलेल्या शेतकऱ्यांना आधार देण्यासाठी प्रतापराव चिखलीकर यांनी राज्य सरकारकडे पाठपुरावा करून पूरग्रस्तांना तातडीने मदत करण्याची विनंती केली होती . यासाठी त्यांनी तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे , उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्याकडे पाठपुरावा केला होता. त्यामुळे या पाठपुराव्याला यश आले असून आता कंधार तालुक्यासाठी ७३ हजार ६५० बाधित शेतकऱ्यांसाठी ७१ कोटी २७ लाख रुपये, लोहा तालुक्यासाठी ८० हजार ८४० बाधित शेतकऱ्यांसाठी ८४ कोटी ४० लाख रुपये, शेतकऱ्यांसाठी ८१२ कोटी ३८६ लाख रुपये मंजूर झाले आहेत. दिनांक ०१.०१.२०२४ च्या शासन निर्णयानुसार नोव्हेंबर २०२३ मधील अवेळी पाऊस व गारपीट यामुळे झालेल्या व त्यापुढील कालावधीसाठी अवेळी पाऊस व गारपीट व इतर नैसर्गिक आपत्तीमुळे होणाऱ्या शेतीपिकाच्या नुकसानीसाठी सुधारित दराने २ ऐवजी ३ हेक्टरपर्यत मदत मंजूर करण्यात आली आहे. त्यामुळे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांनी ई केवायसी करून घ्यावे असे आवाहन आ.प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी केले आह

# येत्या दोन दिवसात खातेवाटप-फडणवीस

नागपूर दि.१५ (वृत्तसेवा): आज नागपूर येथे महाविकास आघाडी सरकारचा मंत्र्यांचा शपथविधी समारंभ पार पडला. या सोहळ्यासनंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी माध्यमांशी संवाद साधला. यावेळी मुख्यंमत्री फडणवीस यांनी सांगितले की येत्या दोन दिवसात खाते वाटप पूर्ण करणार असून यबाबत सर्व चर्चा झाली आहे असे सांगितले. आजच्या सोहळ्यात ३९ मत्र्यांनी शपथ घेतली त्यात ३३ कॅबिनेट तर ६ राज्यमंत्री आहेत. पुढे ते म्हाणाले की मंत्रिमंडळामध्ये सर्व समाजाला स्थान दिले आहे. काही नाराज असून त्यांची समजूत काढू, उद्यापासून सुरु होणाऱ्या अधिवेशनात अभिभाषणावरील चर्चा आणि २० बीले मांडणार आहोत. मी व माझे सहकारी चांगल काम करुन दाखवू अशी ग्वाहीही त्यांनी दिली. इव्हीएम बाबत बोलताना ते म्हणाले इव्हिएम म्हणजे एवरी व्होट फॉर महाराष्ट्र आहे. विरोधक इव्हीएम संदर्भात ते एक नेरेटिव सेट करत आहेत. आता त्यांच्याकडे कोणताही मुद्या राहिलेला नाही. सोयाबीनची मोठ्या प्रमाणात खरेदी सुरू आहे, सोयाबिनचा हमी भावापेक्षा कमी रेट होता तो आम्ही वाढवून दिला आहे. तसेच धानाच्या शेतकऱ्याला आम्ही मदत केली. बीडमध्ये झालेल्या सरपंच हत्याप्रकरणी बोलताना ते म्हणाले की बीड जिल्ह्यातील जी घटना निर्घृण आहे. या संबंधी कारवाई झाली आहे, तीन आरोपी सापडले आहे इतरही लवकरच सापडतील आम्ही कोणत्याच आरोपीला सोडणार नाही. एसआयटी नेमून त्याच्या माध्यमातून सर्व धागे दोरे आम्ही काढू. पूढे त्यांनी विरोधकांना टोला लगावला. चर्चा न करता पळ काढू नये, सभागृहात बोला केवळ मीडियातून बोलू नका असे विराधकांना सांगितले. आम्ही सर्व मुद्यावर चर्चा करू असेही त्यांनी स्पष्ट केले.

# गोरक्षनाथ विद्यालय ढेकणमोहा येथे जागतिक एड्स जनजागृती कार्यक्रम संपन्न



बीड । प्रतिनिधी दिनांक /१४/१२/२०२४ रोजी गोरक्षनाथ विद्यालय व महाविद्यालय ढेकनमोहा या ठिकाणी एक डिसेंबर ते १५ डिसेंबर जागतिक एड्स जनजागृती पर कार्यक्रमाचे आयोजन केले होते. बीड जिल्हा रुग्णालय जिल्हा एड्स नियंत्रण कक्ष डापको ग्रामीण विकास मंडळ बनसारोळा लिंक वर्कर स्कीम बीड जिल्हा व गोरक्षनाथ विद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी जिल्हा एड्स नियंत्रण कक्ष डापको सुहास जी कुलकर्णी सर, लिंक वर्कर बीड जिल्हा स्कीम चे डी आर पी रामेश्वर वाघमारे सर. लिंक वर्कर अंगद खवतड, संस्थेचे सचिव सोमनाथ बडे सर, संस्थेचे सहसचिव संजय बडे सर, शाळेचे मुख्याध्यापक डी. एस. मुंडे सर, घोळवे सर, पत्रकार विनोद शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी रामेश्वर वाघमारे सर यांनी सर्व विद्यार्थ्यांना जनरल नॉलेज शैक्षणिक महत्त्व पटवून सांगितले व मोबाईल च्या माध्यमातून बरेचसे विद्यार्थी प्रगती झाली तर काही विद्यार्थ्यांची अधोगती झाली जे काही मोबाईलच्या माध्यमातून चांगल्या गोष्टी किंवा अभ्यासक्रम केला पाहिजे. इतर गोष्टीकडे लक्ष न देता आपण आपल्या जीवनामध्ये क्षेत्र निवडले आहे. त्या क्षेत्रामध्ये रात्रंदिवस मेहनत करून आपण आपला अस्तित्व निर्माण करून समाजाला आदर्श व्यक्तिमत्व झाले पाहिजे, तर डी एस कुलकर्णी सर यांनी एचआयव्ही एड्स आजाराबद्दल सविस्तर माहिती व मार्गदर्शन केले. सर्वांना एचआयव्हीचे कारणे व त्यावर उपाय आणि एड्स बद्दल माहिती दिली, अशावेळी कोणतीही व्यक्ती या बाधित असेल त्या व्यक्तीने न घाबरता जिल्हा रुग्णालय या ठिकाणी आपली तपासणी करून वेळेची वेळी तपासणी करून गोळ्या औषध नियमित घ्यावे. कॉलेज तरुणांना संदेश देण्यात आला, माझं आरोग्य माझा अधिकार आपण आपल्या आरोग्याची सतत काळजी घेतली पाहिजे. या जीवनामध्ये दोनच स्पर्धा आहेत, त्या स्पर्धा म्हणजे शिक्षण आरोग्य या दोन स्पर्धेमध्ये विद्यार्थी आणि विद्यार्थिनी आपलं जीवन पूर्ण अर्पण करतात तेच विद्यार्थी जीवनामध्ये सक्सेसफुल होऊ शकतात शिक्षण घेत असताना दैनंदिन अभ्यासक्रम जनरल नॉलेज नियमित शाळेत कॉलेजला जाणे आणि दुसरी गोष्ट म्हणजे आरोग्य उत्तम ठेवायचा असेल तर दररोज सकाळी व्यायाम करणे, सकस आहार घेणे आणि एक वर्षांमधून एक वेळेस जिल्हा रुग्णालय या ठिकाणी जाऊन आपल्या रक्ताची तपासणी करणे, एचआयव्ही एसटीआय टी बी व अनेक आजाराविषयी तपासणी करून घेणे जेणेकरून आपले आरोग्य उत्तम राहील आणि आपल्या जीवनामध्ये कसले प्रकाराची अडचण येणार नाही याची आपण काळजी घेतली पाहिजे असे कुलकर्णी सर यांनी सांगितले या कार्यक्रमाचे प्रस्तावित लिंक वर्कर अंगद खवतड यांनी केले, तर या कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन शाळेचे मुख्याध्यापक डीएस मुंडे सर यांनी केले. यावेळी सर्व शिक्षक, प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी, विद्यार्थिनी मोठ्या संख्येने कार्यक्रमासाठी उपस्थित होते.

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com